**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.**

**दरपत्रक फॉर्म**

**प्रति,**

**मा.कार्यकारी अधिकारी,**
**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**विषय - <u>श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.</u>**
**सन** २०२४ - **दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेबाबत.**

**पुरवठाधारकाचे नांव – श्री** - -------------------------------------------------------

**पूर्ण पत्ता** – - -------------------------------------------------------

-------------------------------------------------------

**भ्रमणध्वनी** – - ------------------------------------------

**महोदय,**

**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्यावतीने सन** २०२४ **साठी "दैनंदिनी व दिनदर्शिका (भिंतीवरील)" छपाई कामाचे दि.**---/----/२०२३ **रोजीचे जाहीर दरपत्रकाप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक सादर करीत आहे.**

| अ.क्र. | तपशिल | दर – प्रती नग (सर्व करासह व पोहोच खर्चासह) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | **दैनंदिनी सन** २०२४ | |
| २ | **दिनदर्शिका (भिंतीवरील)** | |

सदर दराने छपाई करून तात्काळ पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणांकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र करून देण्यास मी तयार आहे. तसेच **रू.५०००/-** अनामत रक्कमेचा डीडी/जमा पावतीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. तरी वरील नमूद दरपत्रकाप्रमाणे सदरच्या छपाईचे काम मला मिळणेस विनंती आहे.

**दि.----/----/२०२३.** **पुरवठाधारकाची सही व शिक्का**

**सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडलेली आहेत.**

१. अनामत रक्कमेचा डीडी/जमा पावतीची छायांकित प्रत.
२. यापूर्वी सदरची छपाई करून पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची छायांकित प्रत (पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र व आधारकार्ड)
४. छपाई कामासाठी आवश्यक असणा-या शासकीय परवान्यांच्या प्रती.
५. शॉप ॲक्ट लायसन्स
६. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.**

**'सन २०२४ - दैनंदिनी व दिनदर्शिका' छपाई कामाचे जाहीर दरपत्रक.**

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत श्री संत तुकाराम भवन येथे उपलब्ध होऊन मिळतील, तसेच www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाफ्यात सिलबंद करून दि.११/०९/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत सादर करणे आवष्यक आहे. लिफाफ्यावर ठेकेदाराचे नांव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक 'सन २०२४ - दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणेकामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमूद करावा.

२. दरपत्रक समक्ष श्री संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिष्टर पोष्टाने पाठवावे. उशिरा प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३. अनामत रक्कम रू.५०००/- डीडी/रोख स्वरूपात भरणे आवश्यक आहे किंवा डीडी 'कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नांवे काढावा.

४. छपाई कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | छपाई संख्या (नगामध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | दैनंदिनी<br>तपशिल - | ३००० |
| २ | दिनदर्शिका (भिंतीवरील)-<br>तपशिल - | ३००० |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमून्यांतच छपाई करणे आवश्यक आहे.

६. छपाई नमूना देणगी विभाग, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे पहावयास मिळेल.

७. छपाई चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

८. छपाईमध्ये व त्यासाठी वापरण्यात आलेल्या कागदामध्ये अथवा बांधणीमध्ये दोष आढळून आलेस ठेकेदारास जबाबदार धरणेत येईल. प्रस्तुतकामी दुबार छपाई करणेचे झालेस ती ठेकेदाराने स्वखर्चाने करून देणेची आहे.

९. छपाईची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकीय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकांस जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ०५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

११. छपाई खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकांस जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१२. दरपत्रकात नमूद दर सर्व करासहित नमूद करावा. तसेच सर्व छपाईचा दर नमूद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतूक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठा धारकांस दिला जाणार नाही.

१३. पुरवठा करण्यात आलेल्या छपाईची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झालेखेरीज बील अदा केले जाणार नाही. सदरची छपाई करून श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे पुरवठा करणे आवष्यक आहे.

१४. सदर कामाचे मंजूर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार ०२ टक्के आयकर कपात करणेत येईल.

१५. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदा धारक जबाबदार राहील.

१६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रके कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवलेला आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्भवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकांस जबाबदार धरणेत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२०. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रू. १००/- चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (Affidevit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

------//------

## प्रतिज्ञापत्र

मी श्री. ------------------------------ वय ....... वर्ष सत्यप्रतिज्ञेवर, कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना करारनामा लिहून देतो की, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीला सन २०२४ साठी लागणा-या 'दैंनदिंनी व दिनदर्शिकांची'छपाई करून पुरवठा करणेसाठी माझे दरपत्रक मंजूर झाले आहे. त्यासाठी माझेकडून रू.५,०००/- अनामत रक्कम म्हणून भरून घेण्यात आलेली आहे. सदरच्या निविदेसाठी मंदिर समितीच्या खालील अटी व शर्तीना मी मान्यता देत आहे.

१. मी दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या खालील दराने दैंनदिंनी व दिनदर्शिकांची छपाई करून पुरवठासमितीच्या मागणी प्रमाणे करणेस बांधील आहे.

२. दैंनदिंनी व दिनदर्शिका छपाई कामाचा व मंजुर दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | छपाई संख्या (नगामध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | दैनंदिनी<br>तपशिल - | ३००० |
| २ | दिनदर्शिका (भिंतीवरील)-<br>तपशिल - | ३००० |

३. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा अंतिम केलेल्या नमुन्यांतच सन २०२४ च्या दैंनदिंनी व दिनदर्शिका छपाई करणे आवश्यक आहे.

४. सन २०२४ साठी दैंनदिंनी व दिनदर्शिका छपाईसाठी वापरण्यात येणारा कागद व इतर साहित्य चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे.

५. सन २०२४ साठी दैंनदिंनी व दिनदर्शिका छपाईमध्ये व त्यासाठी वापरण्यात आलेल्या कागदामध्ये अथवा बांधणीमध्ये दोष आढळून आलेस आपणास जबाबदार धरणेत येईल. प्रस्तुतकामी दुबार छपाई करण्याचे झालेस ती आपण स्वःखर्चाने करून देणेची आहे.

६. सन २०२४ साठी दैनंदिनी व दिनदर्शिकाची एक प्रत तयार झालेनंतर या कार्यालयाकडील प्रतिनिधी तपासून देईल, त्यानंतरच अंतीम छपाई करावी.

७. सदर छपाई पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार दि. १०/११/२०२३ पूर्वी मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस मला जबाबदार धरून छपाई किंमतीच्या ०५ टक्केपर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. पुरवठा करण्यात आलेल्या छपाईची प्रत व प्रमाण देणगी विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

९. वरील नमुद छपाईचा दर सर्व करासहीत आहे. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च आपणास दिला जाणार नाही.

१०.सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

११. दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईचा (Soft Copy) मंदिर समितीला देणे आवश्यक आहे.

१२.समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते माझ्यावर बंधनकारक राहील.

१३.मला छपाईचा पुरवठा मध्येच थांबवता येणार नाही. जर असे झाल्यास अनामत रक्कम जप्त करून आपले नाव काळया यादीत टाकले जाईल.

१४. प्रशासकीय व अन्य कारणास्तव पुरवठा आदेश कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१५. सदर कामासंबंधी काही वाद निर्माण झाल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१६.वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस आपणास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

याप्रमाणे श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीला करारनामा (प्रतिज्ञापत्र) लिहून दिले आहे. ते आमच्यावर पूर्णपणे बंधनकारक आहे.

---------------------//-----------------------